Downloaded from SkillCouncils.com

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महिला व बाल विकास विभाग

## जाहीर प्रकटन क्रमांक ०१ /२०२५-२०२६ दि.२२/०४/२०२५

सांगली मिरज आणि आणि कुपवाड शहर महानगरपालिका, महिला व बालविकास विभागाने खाली नमूद केले कामासाठीची निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचा तपशील | निविदा फॉर्म फी ना परतावा | बयाणा रक्कम रु. (परतावा) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | मनपा हद्दीतील गरजू महिला व युवतींना ब्युटी पार्लर चे प्रशिक्षण देणे | र.रू १०००/- | १२००० | करारा नुसार |

१) संपूर्ण निविदा प्रक्रिया ही online राहील. निविदा धारकाने स्वत:चे डिजीटल सिग्नेचर वापरुन निविदा भरण्याची आहे. सदर निविदा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलद्वारे भरण्याची आहे. (offline निविदा स्विकारली जाणार नाही)

२) वरील कामगिरीसाठी बयाणा रक्कम अंदाजपत्रकीय दराच्या १% राहील व निविदा फॉर्म खरेदी फी रु. १२५०/- (सातशे पन्नास) + शासकीय फी) मात्र असून, सदर रक्कम online भरण्याची आहे.

३) सदर निविदे साठी सुरक्षा अनामत रक्कम हे ५ % राहील.

४) सदर प्रशिक्षण कामी (Training Sylabus) सूची क्र.०१ निविदा मध्ये लगत केली आहे.

५) लिफाफा क्र.२ म्हणजे BOQ मध्ये दर भरण्याचे आहेत. BOQ मधील एकुण रक्कमेवर L१ ठरविण्यात येईल.

६) मनपाच्या नमून्यामध्ये व शर्ती-अटी नुसार करारपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

७) याकामाच्या ई-निविदा कालावधी दिनांक - २३/०४/२०२५ ते २९/०४/२०२५ सायं. ४.०० वाजे पर्यंत राहील.

८) वरील कामाची ई-निविदा दि.३०/०४/२०२५ रोजी सायं.४.०० वाजता उघडण्यात येईल.

९) कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

१०) कोणतीही निविदा स्विकारणे, नाकारणे,किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करणे, तसेच निविदा शर्ती अटी मध्ये बदल करणे, निविदा वेळापत्रकामध्ये बदल करणे किंवा इतर अन्य सर्व बाबींचा अधिकार मनपा आयुक्त तथा प्रशासक यांचा राहील. याबाबत कोणतीही तक्रार , हरकत , नोटीस यांचा विचार केला जाणार नाही.

(स्मृती पाटील)
उप आयुक्त
(महिला व बाल विकास विभाग)
सां.मि.कु. मनपा

दिनांक - २२/०४/२०२५

Downloaded from SkillCouncils.com

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
# महिला व बाल कल्याण समिती
## निविदा शर्ती व अटी (जाहीर प्रकटन क्र. /२०२४-२५)

कामाचे नाव :- गरजू महिलांना व युवतींना ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देणे.

निविदा शर्ती व अटी :-

१) संपूर्ण निविदा प्रक्रिया ही online राहील. निविदा धारकाने स्वत:चे डिजीटल सिग्नेचर वापरुन निविदा भरण्याची आहे. सदर निविदा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलद्वारे भरण्याची आहे. (offline निविदा स्विकारली जाणार नाही)

२) वरील कामगिरीसाठी बयाणा रक्कम अंदाजपत्रकीय दराच्या १% असून, रक्कम online भरण्याची आहे.

३) निविदा फॉर्म खरेदी फी रु. १०००/- (एकहजार) मात्र राहील. (विना परतावा)

४) सदर निविदे साठी सुरक्षा अनामत रक्कम हे ५ % राहील.

५) लिफाफा क्र.१ :- मध्ये

i. निविदा फॉर्म फी व बयाणा online भरलेले चलन.

ii. पॅनकार्डची प्रत (कंपनी / भागीदारी संस्था निविदा भरत असेल तर संबंधित कंपनी / भागीदारी संस्थेच्या नावाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक आहे. प्रोप्रायटरी फर्म्सचे पॅनकार्ड प्रोप्रायटरच्या नावाचे असावे).

iii. निविदाधारकांचे (Bidder) कंपनी / भागीदारी संस्था / प्रोपायटरी फर्म्सचे संबंधित नोंदणी प्रमाणपत्र (कंपनी असल्यास कंपनी अधिनियमांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र, भागीदारी संस्था असल्यास भागीदारी संस्था नोंदणी प्रमाणपत्र व आस्थापना अधिनियमांतर्गत (गुमास्ता) नोंदणी प्रमाणपत्र). MSME नोंदणी

iv. **सरासरी वार्षिक उलाढाल:** निविदाधारकाची मागील ३ वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल स्टेटमेंट, यामध्ये उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate) सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले असावे.

v. सदरचे प्रशिक्षण देण्यासाठी मनपा हद्दीमध्ये स्वत:चे मालकीचे ७०० ते १००० स्के.फू. मापाचे सर्व सोयीने युक्त इन्स्टिट्युट असल्याचा पुरावा(घरपट्टी / पाणीपट्टी / विज देयक) जोडणे बंधनकारक आहे.

vi. **ब्युटी पार्लर इस्टिट्युटचे** Skillindia **अंतर्गत** Training Provider म्हणून नोंदणी प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

vii. **अनुभव:** निविदाधारकाने शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडे शासकीय-निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मार्फत Beautician Course / Beauty parlor course यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे दाखले सादर करण्याचे आहेत. अनुभवासाठी निविदाधारकाने प्रत्यक्ष केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

i. **व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र** (PT), कर्मचारी भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र (EPF) ),कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC) किंवा लागू होत नसल्याचे हमी पत्र.

viii. निविदाधारकाला मागील ५ वर्षांत शासकीय / निमशासकीय संस्था / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळाने काळ्या यादीत टाकलेले नाही, याबाबतचे निविदाधारकाच्या लेटर हेडवरचे हमीपत्र.

ix. निविदाधारकाने निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्रांची सत्यता दर्शविणारे रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र.

x. GST **मधील तरतूदीनुसार पात्र असल्यास** GST **नोंदणी प्रमाण पत्र** जोडणे आवश्यक आहे. अन्यथा हमी पत्र जोडावे.

xi. MSME **नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.** X

६) लिफाफा क्र.२ म्हणजे BOQ मध्ये दर भरण्याचे आहेत. BOQ मधील एकुण रक्कमेवर L१ ठरविण्यात येईल.

Downloaded from SkillCouncils.com

शर्ती अटी-

उक्त निविदेमधील कामांसाठी एखद्या निविदाधारकाची निविदा मंजूर करतेवेळी त्याचा या पूर्वी महानगरपालिकेकडे स्थगित असलेली कामे तसेच त्यांनी केलेल्या कामाचा दर्जा / कामाची गुणवत्ता इ. बाबींचा विचार करून निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचे अधिकार महानगरपालिकेस राहील.

१) कोणती ही निविदा मंजूर / नामंजूर करणेचा अधिकार महापालिकेने राखून ठेवलेला आहे.
२) निविदा फॉर्मच्या अनुषंगाने अंदाजपत्रके /इतर माहितीसाठी मक्तेदार / पुरवठादार यांनी संबंधित विभाग प्रमुखांकडून माहिती घेणेची आहे.
३) आलेल्या निविदा, निविदा कमिटी समोर उघडल्या जातील.
४) वरील कामासाठी अंदाजपत्रकामध्ये नमूद केलेल्या विभागाने ठरवून दिलेल्या वर्णना नुसार / दरानुसार करणे बंधनकारक राहील.
५) बदल केलेले किंवा वाढ केलेले कामाबद्दलचे Item इस्टीमेट मध्ये नसलेले साहित्य सदर अॅटम बाजार भावप्रमाणे धरण्यात येतील.
६) विशेष प्रसंगी जरूर त्या कारणासाठी काम तात्पुरते थांबविण्याचा मा.आयुक्त/ मा.उप-आयुक्त / सिस्टीम मॅनेजर यांनी कॉन्ट्रॅक्टर यास हुकूम केल्यास त्याबद्दल कोणत्याही सबबीवर कॉन्ट्रॅक्टर यास नुकसानी मागता येणार नाही.
७) विभागाच्या मागणी तपशीलाप्रामाणे मुदतीत कामगिरी करणे जबाबदारी मंजूर मक्तेदराची राहील. सदर कामगिरी करणेस जादा विलंब झालेस अन्य कॉन्ट्रॅक्टर कडून केले जाईल यामध्ये महानगरपालिकेचे नुकसान झालेस मंजूर मक्तेदाराकडून रक्कम वसूल केले जाईल.
८) फायनल बिल हेण्यापूर्वी पुराने, अपघाताने किंवा दुसऱ्या कोणत्याही आकस्मिक कारणाने कामाचे जे नुकसान होईल त्याची जबाबदारी मक्तेदारावर राहील व त्या कामाची दुरुस्ती किंवा पुन्हा कामगिरी करणे मक्तेदाराला स्वखर्चाने भाग पडेल.
९) कोणत्याही कारणासाठी मनपाचे परवानगी शिवाय मक्तेदारास यादीतील काम दुसऱ्यास तबदील करता येणार नाही.
१०) सर्व काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूदी, स्पेसिफिकेशनप्रमाणे महानगरपालिकेचे विभाग प्रमुख सांगतील त्याचप्रमाणे करावयाचे आहे.
११) करार पत्र करून दिल्यानंतर महानगरपालिकेने वर्क ऑर्डर दिलेल्या मुदतीत मंजूर झालेल्या कामाची मुदतीत पूर्तता करणे बंधनकारक राहील अन्यथा त्या पुढे प्रत्येक दिवसास रुपये १०० /- मात्र दंड करण्यात येईल पुरवठाधारकाने मुदतीत पुरवठा न केल्यास महानगरपालिका दोन नंबरच्या मक्तेदारास वर्क ऑर्डर देईल व त्यामध्ये जो ज्यादा खर्च येईल तो मंजूर मक्तेदाराकडून वसूल केला जाईल.
१२) कोणत्याही कारणास्तव अॅडव्हान्स दिला जाणार नाही.
१३) ज्याचे टेंडर मंजूर करण्यात येईल त्याला टेंडर मंजूर झाल्याची पहिली समज दिल्यापासून ७ दिवसाचे आत मुदतीची दिल्यापासून इस्टिमेंट रक्कमेवर ५% प्रमाणे होणारी सुरक्षा अनामत रक्कम रोखीने भरण्याची आहे. अन्यथा सदर सुरक्षा अनामत मक्तेदाराच्या प्रथम देयकातून कपात करण्यात येईल.
१४) सदर कामगिरी ठेकेदारने दिलेल्या मुदतीत पूर्ण करावयाचे आहे. त्याचा कालावधी हा ऑर्डर दिलेल्या तारखेपासून धरण्यात येणार आहे.
१५) टेंडर दिले नंतर त्याबाबत कसलाही खुलासा किंवा सबब ऐकली जाणार नाही व त्याचा विचार ही केला जाणार नाही.
१६) सदर कामी पुरविणेत/बसविणेत येणारे सर्व साहित्य मानांकित केलेल्या कंपनी/ मेकचे / शासन मान्यताप्राप्त कंपनीचे असणे आवश्यक आहे. त्यामध्ये बदल करणे अथवा न करणे याचा अधिकार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांना राहील.

Downloaded from SkillCouncils.com

१७) सदर कामची सुरक्षा अनामत रक्कम कामाची मुदत संपले नंतर एक महिन्यानी अदा करणेत येईल.

१८) कामाचे आदेश दिलेल्या दिनांकापासून (मौखिक / लेखी) सत्वर मक्तेदाराने कामगिरी सुरू करणे बंधनकारक राहील.

१९) उक्त निविदा प्रक्रियेमधील सर्वात कमी दराच्या निविदाधारकाचा दर हा अंदाजपत्रकीय दराच्या किंमतीपेक्षा १० टक्केपेक्षा जादा/कमी असेल तर सदर निविदा धारकाने दर जादा/कमी भरलेबाबत लेखी खुलासा मनपास देणेत यावा.

२०) सदरचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दर असल्यामुळे त्यास कोणतीही दरवाढ मागता येणार नाही.

२१) सदर अटी व शर्तीमध्ये सुधारणा करणे अटी-शर्ती वाढविणे /कमी करणेचा अधिकार मा. आयुक्त/ मा.अति आयुक्त / सिस्टीम मॅनेजर यांना राहील.

२२) अंदाजपत्रकीय रक्कम ही माहिती व तंत्रज्ञान विभागाने साहित्याच्या आवश्यकतेप्रमाणे व मागणीप्रमाणे कमी जास्त होवू शकते.

२३) पुरविण्यात आलेल्या साहित्याचा वॉरंटी कालावधी संपेपर्यंत संबंधित साहित्याची देखभाल,दुरूस्ती व साहित्य रिप्लेसमेंटची जबाबदारी ही लिहून देणाऱ्याची असेल.

२४) वरील प्रमाणे टेंडर शर्ती अटी मान्य असल्याबाबत निविदा शर्ती फॉर्म स्वाक्षरी करून लिफाफा क्रमांक एक मध्ये जोडणे बंधनकारक राहील अन्यथा निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

वरील प्रमाणे शर्ती अटी तपासले आहेत

- निविदा समिती -

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ( आकाश डोईफोडे ) | (अभिजीत मेंगडे ) | (शिरीष धनवे) | (स्मृती पाटील) | (रविकांत आडसूळ) |
| सहाय्यक आयुक्त | मुख्य.लेखाधिकारी | मुख्य.लेखापरीक्षक | मा.उप आयुक्त् | मा.अति आयुक्त् |
| सां.मि.कु. मनपा | सां.मि.कु.मनपा. | सां.मि.कु.मनपा. | सां.मि.कु.मनपा. | सां.मि.कु.मनपा. |